# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
## कृषि नगर, अकोला

# -नागरिकांची सनद-

**प्रस्तावना :-**

भारत हा कृषि प्रधान देश असल्याने देशाची एकंदरीत आर्थिक प्रगती प्रामुख्याने शेतीच्या उत्पादकतेवर अवलंबुन असते. शेती हे प्राथमिक क्षेत्र असल्याने शेतीचा विकास शास्त्रीय पध्दतीने करुन नविन तंत्रज्ञानाचा फायदा शेतीसाठी व शेतक-यांसाठी व्हावा यासाठी कृषि विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. या कृषि विद्यापीठाच्या कार्याचा मुळ उद्देश कृषि शिक्षण, कृषि संशोधन व कृषि विस्तार शिक्षण असून कृषि क्षेत्रातील कार्यक्षम मनुष्यबळ निर्माण करुन त्याचा उपयोग कृषि, कृषि अभियांत्रिकी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, वनविद्या व उद्यानविद्या क्षेत्रामध्ये उपलब्ध करुन देणे हे आहे. या व्यतिरिक्त महाराष्ट्र शासनास निरनिराळे कृषि विषयक धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी तांत्रिक सल्ला देणे तसेच अखिल भारतीय स्तरावर संशोधन करण्यासाठी भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या मार्फत कृषि विषयक धोरणे राबविण्यासाठी सहाय्य करणे.

कृषि विद्यापीठात विकसीत झालेले तंत्रज्ञान आणि सुधारीत वाणांची बियाणे, कृषि विभाग व महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळामार्फत शेतक-यांपर्यंत पोहोचविले जाते. विद्यापीठात विकसीत झालेल्या कृषि तंत्रज्ञानाच्या विस्ताराची जबाबदारी ही शासनाच्या कृषि खात्याकडे आहे. कृषि विद्यापीठाकडे विस्तार शिक्षणाचा महत्वाचा भाग असून त्याद्वारे विस्तार कार्यकर्ते, ग्राम विस्तारक, विषय विशेषज्ञ विविध खात्यातील अधिकारी शेतकरी आणि शेतकरी महिला यांना प्रशिक्षण दिले जाते. लिखीत साहित्य, प्रसार माध्यमे, विविध संपर्क पध्दतीद्वारे कृषि विषयक माहिती प्रसारीत केली जाते.

कृषि विद्यापीठाची प्रमुख उद्दीष्टे कृषि शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण हे असल्याने या विद्यापीठाकडून कृषि विषयाशी संलग्न परंतु वाणिज्यीक स्वरुपातील थेट सेवा जनतेस पुरविल्या जात नाही किंवा तसा सेवा पुरविण्याचा परस्पर संबंध येत नाही. तथापी, कृषि विद्यापीठाकडून खालील मुद्यांबाबत विदर्भातील शेतक-यांना माहिती देण्यात येते आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मार्गदर्शनाचे काम केले जाते.

**विद्यापीठाकडून पुरविल्या जाणा-या सेवा :-**

१. **माती परिक्षण :** मातीचा नमूना प्राप्त झाल्यानंतर शेतक-यांच्या मागणीनुसार प्रयोगशाळेत परिक्षण करुन १५ (पंधरा) दिवसामध्ये अहवाल दिला जातो. ही सेवा विद्यापीठाने निश्चीत केलेल्या दरात पुरविली जाते. अशी सेवा विद्यापीठ मुख्यालय अकोला तसेच कृषि महाविद्यालय, नागपूर येथे उपलब्ध आहे.

२. **पाणी परिक्षण :** पाण्याचा नमुना प्राप्त झाल्यानंतर शेतक-यांच्या मागणीनुसार प्रयोगशाळेत परिक्षण करुन १५ (पंधरा) दिवसामध्ये अहवाल दिला जातो. ही सेवा विद्यापीठाने निश्चीत केलेल्या दरात पुरविली जाते. अशी सेवा विद्यापीठ मुख्यालय अकोला तसेच कृषि महाविद्यालय, नागपूर येथे उपलब्ध आहे.

**मार्गदर्शन व सल्ला :-**

१. केंद्र/ राज्य शासन/ भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचेकडून आखुन आलेल्या प्रमाणकानुसार व विषयानुसार शेतकरी प्रशिक्षण/ मेळावा/ चर्चासत्र आयोजीत करुन कृषि माहिती व तंत्रज्ञान पुरविणे, मार्गदर्शन करणे, समस्या सोडविणे.

२. दुरध्वनीद्वारे प्रत्यक्ष संपर्क साधण्यासाठी कृषि विद्यापीठाची कृषि माहिती वाहिनी सेवा (हेल्प लाईन) उपलब्ध आहे.

- अकोला - प्रत्येक गुरुवारी
  दुपारी २.३० ते ५.३०
  दुरध्वनी क्रमांक : ०७२४-२२५८४६२
- नागपूर - प्रत्येक सोमवारी
  दुपारी २.३० ते ५.३०
  दुरध्वनी क्रमांक : ०७१२-२५३०६८३
- सिंदेवाही - प्रत्येक मंगळवारी
  दुपारी ३.०० ते ५.००
  दुरध्वनी क्रमांक : ९३५९७७०२७१
- साकोली - प्रत्येक मंगळवारी
  दुपारी ३.०० ते ५.००
  दुरध्वनी क्रमांक : ९४०३६१७११३

- विभागीय कृषि संशोधन केंद्र, कृषि विज्ञान केंद्र व आकाशवाणी, यवतमाळ यांचा संयुक्त उपक्रम

**''हॅलो कास्तकार''**

दुरध्वनी क्र. ०७२३२-२४५५८२
ध्वनीमुद्रण क्र. दुसरा व चौथा मंगळवार वेळ : दुपारी ३ ते ४
प्रसारण : दुसरा व चौथा शुक्रवार (टोल फ्री दूरध्वनी सेवा ११११)

- कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र येथे नि:शुल्क दुरध्वनी सेवा

**नि:शुल्क दुरध्वनी सेवा (टोल फ्री) : १८००२३३०७२४**

३. आकाशवाणी व दुरदर्शनवरुन वेळोवेळी शेती विषयक माहिती प्रसारीत केली जाते.

४. छपाई माध्यमातून उदा. प्रती वर्षी कृषि संवादिनी, कृषि पत्रिका मासिक, विविध विषयाच्या घडी पत्रिका तसेच कृषि विषयक माहिती असलेली कृषि दिनदर्शिका, पंदेकृवि बातमी पत्र इ. प्रकाशनाद्वारे व वृत्तपत्रातून लेख प्रसिध्द करुन माहिती व मार्गदर्शन केले जाते.

**<u>कृषि विषयक माहिती पुरविणे :-</u>**

१. कृषि प्रदर्शनातून व फोटो गॅलरीच्या माध्यमातून कृषि विषयक माहिती दिली जाते.

२. व्हिडीओ / सिडी द्वारे कृषि माहिती प्रसारीत केली जाते.

३. कृषि औजारे व यंत्रांचा वापर करणेबाबत माहिती पुरविली जाते.

४. कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र व डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती केंद्र येथे कृषि विद्यापीठ निर्मीत व शिफारस केलेली कृषि तंत्रज्ञानाची सचित्र माहिती प्रदर्शीत करण्यात येते.

५. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ येथील विद्यापीठातील सर्व कर्मचा-यांच्या पगारातून खर्च करुन डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नावाचे स्मृती केंद्र उभारण्यात आले आहे. या स्मृती केंद्रात एकूण ३ कक्ष आहेत. पहिल्या कक्षात डॉ. पंजाबराव देशमुख यांचे फोटो गॅलरी व त्यांनी वापरलेल्या वस्तूंचा संग्रह आहे. कक्ष २ व ३ मध्ये विद्यापीठाने विकसीत केलेले तंत्रज्ञान व विस्तार प्रणालीचे कार्यक्रम यांची माहिती विभागवार मांडण्यात आली आहे. याशिवाय या स्मृती केंद्रात ५० शेतक-यांना मार्गदर्शन करण्यासाठी सुसज्ज हॉल आहे.

**<u>कृषि विषयक उत्पादन विक्री :-</u>**

१. विद्यापीठाने विकसीत केलेल्या विविध शेती पिकांच्या वाणांचे विद्यापीठ प्रक्षेत्रावर उत्पादीत बियाणे उपलब्धतेनुसार मुख्यालय तसेच संलग्न संशोधन केंद्रावर विक्रीसाठी उपलब्ध केले जाते.

२. कलमी/ रोपे तयार करुन विक्री केली जातात. विद्यापीठाने निश्चीत केलेल्या दराने शेतक-यांना कलमे/ रोपे उपलब्धतेनुसार पुरविली जातात.

३. जैविक खते तयार करुन शेतक-यांना उपलब्ध करुन दिली जातात व त्याची विक्री विद्यापीठाने निश्चीत केलेल्या दरानुसार केली जाते.

**<u>शैक्षणिक :-</u>**

या विद्यापीठामध्ये उच्च शिक्षणांतर्गत पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी तसेच निम्न कृषि शिक्षणांतर्गत पदविका व प्रमाणपत्र प्रदान करण्याच्या दृष्टीने शिक्षण देण्यात येते.

अ) **<u>उच्च शिक्षण :-</u>**

| | | |
|---|---|---|
| १. पदवी | : | कृषि, उद्यानविद्या, वनविद्या, कृषि अभियांत्रिकी, कृषि जैवतंत्रज्ञान, अन्न तंत्रज्ञान, कृषि व्यवसाय व्यवस्थापन, |
| २. पदव्युत्तर | : | कृषि, उद्यानविद्या, वनविद्या, कृषि अभियांत्रिकी, कृषि जैवतंत्रज्ञान, कृषि व्यवसाय व्यवस्थापन, |
| ३. आचार्य | : | कृषि, कृषि जैवतंत्रज्ञान, कृषि अभियांत्रिकी |

ब) **निम्न शिक्षण :-**

१. कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम : (२ वर्ष कालावधीचा)

२. कृषि विज्ञान पदविका अभ्यासक्रम : (२ वर्ष कालावधीचा)

३. कृषि तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रम : (३ वर्ष कालावधीचा)

४. माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम : (१ वर्ष कालावधीचा)

क) **शैक्षणिक संग्रहालय :-**

विद्यापीठांतर्गत शैक्षणिक पदवी/ पदविका/ प्रमाणपत्र अभ्यासक्रम इत्यादी माहिती.

**संशोधनात्मक उद्दिष्टे व प्रमुख पिके :-**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत विदर्भातील तिनही कृषि हवामान विभागातील मुख्य उद्दीष्टांना अनुसरुन विद्यापीठाचा संशोधन कार्यक्रम निश्चीत केला जातो. तसेच शेतक-यांचे गरजे प्रमाणे शेती पिके, फळ झाडे, चारा पिके, फुले, भाजीपाला पिके, वनौषधी पिके, दुग्धव्यवसाय, कृषि माल प्रक्रिया, शेतीस लागणारी औजारे, पाणलोट क्षेत्रे विकास, मृद संधारण, जल संधारण, क्षारयुक्त जमिन सुधारणा, ठिबक सिंचन, पशु व्यवस्थापन इ. बाबतचा संशोधन कार्यक्रम राबविला जातो. यासोबतच विद्यापीठात अस्तित्वात असणा-या विविध तांत्रिक विभागामार्फत संशोधन कार्य केले जाते. यामध्ये १९ संशोधन केंद्र, १७ विविध तांत्रिक विभाग व ४ शैक्षणिक प्रक्षेत्रावर सद्यस्थितीत २६ अखिल भारतीय समन्वयीत संशोधन प्रकल्प आणि ३१ राज्य शासन पुरस्कृत प्रकल्पाद्वारा राबविण्यात येत आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय फलोत्पादना अंतर्गत ८ प्रकल्प व राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत ८ प्रकल्प तसेच २० तदर्थ प्रकल्पांतर्गत खालील प्रमाणे विविध शेती पिकांवर संशोधन कार्यक्रम सुरु आहेत.

| | |
|---|---|
| **तृणधान्य :** | धान, गहू, ज्वारी, मका |
| **कडधान्य :** | मुग, उडीद, तूर, हरभरा |
| **गळीत धान्य :** | सोयाबिन, भुईमुग, सुर्यफुल, करडई, तीळ, जवस, मोहरी |
| **नगदी पिके :** | कापूस, ऊस |
| **फळ पिके :** | संत्रा, लिंबू, मोसंबी, चिंच |
| **भाजीपाला पिके :** | मिर्ची, वांगी, कांदा, भेंडी, टोमॅटो, वाल |
| **चारा पिके :** | ल्युसन बर्सीम, स्टायलो, ज्वारी |
| **औषधी व सुगंधी वनस्पती :** | सफेद मुसळी, अश्वगंधा, काळमेघ, पानपिंपरी, अर्जून, |
| **विविध पशुधन :** | गाई व म्हशी |
| **शेतीयंत्र सामुग्री व औजारे :** | विविध पिके कापणी यंत्र, कापूस वेचणी यंत्र, मिनी दालमिल, मिर्ची बियाणे निष्कासन यंत्र, स्लॅशर, न्युमॅटीक टोकन यंत्र, रुंद वरंबा व सरी टोकन आंतर मशागत यंत्र |
| **मत्स्यसंवर्धन :** | जलद गतीने वाढणारे व उत्पन्न देणारे मासे :<br>भारतीय मासे : कटला रोहू व मृगळ<br>परदेशी मासे : चंदेरा गवत्या व सायप्रिन्स<br>हे असून पाण्याच्या उपलब्धतेनुसार मत्स्यबीज तयार करण्यात येते व शेतक-यांना विकण्यात येते तसेच मत्स्यसंवर्धनाविषयी मार्गदर्शन करण्यात येते. |

उपरोक्त संशोधना अंतर्गत विविध पिकांचे संकलीत व सुधारीत वाणांचा विकास करणे, त्यांचे बिजोत्पादन कार्यक्रम राबविणे, विविध फळ झाडांची रोपे/ कलमे तयार करणे, विविध पिकांच्या पिक व्यवस्थापन, पिक उत्पादन व पिक संरक्षण इ. बाबींवर संशोधन करुन त्याविषयी शिफारशी शेतक-यासाठी प्रसारीत केले जाते.

कृषि अभियांत्रिकी शाखामध्ये विविध शेतीचे औजारे व यंत्र सामुग्री यांचा विकास करण्यात येते तसेच जलसिंचन पध्दती, पाणी व्यवस्थापन पध्दती, खतांच्या मात्रा, शेती माल प्रक्रिया इ. विषयावर संशोधन केले जाते.

कृषि क्षेत्रातील अनेक बाबी विचारात घेऊन संबंधीत विषयातील ज्ञान व तंत्रज्ञान विकसीत करण्यासाठी तसेच उन्नत जातीचे विविध वाण व संकलीत वाण तयार करण्यासाठी संशोधन केंद्रे कार्यान्वयीत करण्यात आली आहे. या संशोधन केंद्रातील संशोधनाचा उपयोग शिक्षणासाठी व प्रत्यक्षात शेतक-याकडून शेतीमध्ये वापर करणेसाठी केला जातो.

**<u>शेतक-यांच्या अपेक्षा - विद्यापीठाद्वारे अपेक्षापुर्ती :-</u>**

१. विद्यापीठास भेट देणा-या किंवा दुरध्वनीद्वारे संपर्क साधणा-या शेतक-यास त्यांचे समाधान करुन, सोप्या व त्यांना समजेल अशा भाषेत माहिती देण्यात यावी, यासाठी विद्यापीठात कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र कार्यान्वयीत करण्यात आले असून अधिकारी/ कर्मचारी शेतक-यांना सौजन्याची व सभ्यपणाची वागणूक मिळेल यासाठी प्रयत्नशील असतात.
२. विद्यापीठाकडून केल्या जाणा-या विक्रीमध्ये (बियाणे, प्रकाशने, रोपे इ.) विश्वासहर्ता राहील आणि शेतक-याचे हीत जोपासले जाईल हा मुळ उद्देश असेल.
३. शेतक-यास केले जाणारे मार्गदर्शन, सल्ला व इतर माहिती उपलब्ध साधनांचा पुरेसा वापर करुन तत्परतेने व कोणतीही तक्रार राहणार नाही अशा रितीने करणेसाठी विद्यापीठ वचनबध्द राहील.

**<u>तक्रारीचे निवारण :-</u>**

वरील विषयाच्या अनुषंगाने सेवा, सल्ला किंवा माहिती तथा मार्गदर्शनाचे काम सुरळीतपणे न झाल्यास खालील अधिका-यांकडे तक्रार नोंदविल्यास त्याची तातडीने दखल घेऊन उपाययोजना केली जाईल.

१. संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
२. संचालक, संशोधन, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
३. संचालक, शिक्षण, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
४. कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

दिनांक : ०५ जुन, २०२६

**स्वाक्षरीत/-**
(प्रिती वि. रोडगे)
कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
## कृषि नगर, अकोला

# -नागरिकांची सनद-

## कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत पुरविण्यात येणा-या सेवा

| विभागाकडून पुरविली जाणारी सेवा | सेवा पुरविण्याचा कालावधी | पुरविण्यात येणा-या सेवेसंबंधी संपर्क अधिकारी | सेवा न मिळाल्यास तक्रार अधिकारी |
|---|---|---|---|
| **१) उपकुलसचिव (सामान्य), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला** | | | |
| १. कुलसचिव कार्यालयांतर्गत सर्व कर्मचारी यांचे आस्थापना विषयी सर्व कामे | गरजेनुसार वेळोवेळी | उपकुलसचिव (सामान्य) | कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला |
| २. विद्यापीठांतर्गत सर्व कार्यालयांना वाहन पुरविणे | गरजेनुसार वेळोवेळी | उपकुलसचिव (सामान्य) | |
| ३. विद्यापीठांतर्गत मालमत्तेच्या व इतर सुरक्षेसंबंधी कामे | गरजेनुसार वेळोवेळी | सुरक्षा अधिकारी | |
| ४. कुलसचिव कार्यालयांतर्गत सर्व कार्यालयांना स्टेशनरी पुरविणे | गरजेनुसार वेळोवेळी | उपकुलसचिव (सामान्य) | |
| **२) उपकुलसचिव (विद्या विषयक), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला** | | | |
| **समिती विभाग** | | | |
| १. वेळोवेळी होणा-या कार्यकारी परिषदेच्या सभेचे आयोजन | दोन महिन्यातून एकदा | उपकुलसचिव (विद्या विषयक) | कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला |
| २. वेळोवेळी होणा-या विद्या परिषदेच्या सभेचे आयोजन | तीन ते सहा महिन्यातून एकदा | उपकुलसचिव (विद्या विषयक) | |
| ३. सर्व विद्या शाखेच्या सभेचे आयोजन | तीन ते सहा महिन्यातून एकदा | उपकुलसचिव (विद्या विषयक) | |
| ४. विद्यापीठाच्या वार्षिक अहवालाचे नियोजन | वार्षिक | उपकुलसचिव (विद्या विषयक) | |

| | | | |
|---|---|---|---|
| **परिक्षा विभाग** | | | |
| १. पदवी, पदव्युत्तर, आचार्य यांचे निकालपत्रक तयार करणे व निकाल लावणे. (Provisional Degree Certificate, Grade Card, Degree Certificate, Migration Certificate देणे) | पदवी व पदव्युत्तर परिक्षा - वर्षातून दोनदा | उपकुलसचिव (विद्या विषयक) | कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला |
| २. पदवीदान समारंभाचे आयोजन करणे व समारंभात विद्यार्थ्यांना सुवर्ण, रौप्य व कास्य रोख पुरस्काराचे वितरण करणे | वर्षातून एकदा | उपकुलसचिव (विद्या विषयक) | |
| ३. जिभकाटे, खानखोजे, Best Teacher पुरस्कारासाठी कर्मचा-यांची/ संशोधकांची/ शिक्षकांची निवड करणे | वर्षातून एकदा | उपकुलसचिव (विद्या विषयक) | |
| ४. विद्यापीठांतर्गत सर्व परिक्षांचे नियोजन/ आयोजन करणे | षण्मासिक सत्रान्वये | उपकुलसचिव (विद्या विषयक) | |
| ५. आचार्य पदवीचे प्रबंध तपासणीसाठी पाठविणे | As per need | उपकुलसचिव (विद्या विषयक) | |

## ३) उपकुलसचिव (आस्थापना), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

**या विभागांतर्गत एकूण ८ कक्ष असून त्या अंतर्गत खालील प्रमाणे सेवा पुरविल्या जातात**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. अ-कक्ष | i) विद्यापीठातील कार्यरत सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे गोपनीय अहवालांचे संस्करण, Maintenance, गोपनीय अहवालांची झेरॉक्स प्रत पुरविणे व इतर कामे | गरजेनुसार वेळोवेळी तसेच शासन निर्णयानुसार शासनास तिमाही अहवाल सादर करणे | उपकुलसचिव (आस्थापना), | कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला |
| | ii) विद्यापीठांतर्गत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही | गरजेनुसार वेळोवेळी | | |
| | iii) (a) माहिती अधिकारांतर्गत प्राप्त माहिती/ अपिलीय अर्जाचे कक्ष/ विभाग निहाय सुपूर्दीकरण. | अर्जनिहाय | | |
| | (b) कलम २५ (२) व (३) नुसार जिल्हाधिकारी व शासनास अहवाल पाठविणे. | मासिक/ वार्षिक | | |
| | (c) महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत प्राप्त होणा-या तक्रारींच्या अनुषंगाने शासनास अहवाल पाठविणे | मासिक | | |
| | (d) विद्यापीठातील कार्यरत सर्व अधिकारी/ कर्मचारी यांचे मत्ता व दायित्वबाबतची माहिती संकलीत करणे | गरजेनुसार शासनास माहिती पुरविणे | | |
| | (e) विद्यापीठातील अधिकारी/कर्मचारी यांच्या मागणीनुसार भारतीय पारपत्र मिळण्याकरीता ‘ना हरकत प्रमाणपत्र’ देणे | गरजेनुसार वेळोवेळी | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (f) विद्यापीठातील शिक्षकवर्गीय अधिकारी व इतर अधिकारी यांना पात्रतेच्या दिनांकापासुन स्थायित्व लाभ प्रमाणपत्र निर्गमित करणे<br>(g) विद्यापीठांतर्गत अधिकारी व कर्मचारी यांच्या वयाच्या ५०/५५ व्या वर्षी अथवा अहर्ताकारी सेवेच्या ३० वर्ष पुर्ण झाल्यानंतर विद्यापीठ सेवा पुढे चालु ठेवण्याकरिता त्यांचे सेवेचे पुनर्विलोकन करणे | गरजेनुसार वेळोवेळी<br>गरजेनुसार वेळोवेळी | | |
| **२. ब-कक्ष** | विद्यापीठातील विद्याविषयक अधिकारी व कर्मचारी यांचे नियुक्ती, बदली, NOC व इतर आस्थापना विषयक सर्व कामे तसेच कक्षाशी संबंधीत माहिती/ अपिलीय अर्जासंबंधी कार्यवाही | गरजेनुसार वेळोवेळी | उपकुलसचिव (आस्थापना), | कुलसचिव,<br>डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला |
| **३. ड-कक्ष** | विद्यापीठातील कनिष्ठ संशोधन सहाय्यक, वरिष्ठ संशोधन सहाय्यक, पशुधन पर्यवेक्षक, कृषि सहाय्यक यांचे नियुक्ती, बदली, NOC व इतर आस्थापना विषयक सर्व कामे तसेच कक्षाशी संबंधीत माहिती/ अपिलीय अर्जासंबंधी कार्यवाही | गरजेनुसार वेळोवेळी | | |
| **४. इ-कक्ष** | विद्यापीठातील Ministerial Staff संबंधी नियुक्ती, बदली, NOC व इतर आस्थापना विषयक सर्व कामे तसेच कक्षाशी संबंधीत माहिती/ अपिलीय अर्जासंबंधी कार्यवाही | गरजेनुसार वेळोवेळी | | |
| **५. ई-टेक कक्ष** | विद्यापीठांतर्गत तांत्रिक कर्मचारी यांचे नियुक्ती, बदली, NOC व इतर आस्थापना विषयक सर्व कामे तसेच कक्षाशी संबंधीत माहिती/ अपिलीय अर्जासंबंधी कार्यवाही | गरजेनुसार वेळोवेळी | | |
| **६. म-कक्ष** | विद्यापीठातील खानसामा, मजूर सफाई कामगार व इतर चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांचे नियुक्ती, बदली व इतर आस्थापना विषयक सर्व कामे तसेच कक्षाशी संबंधीत माहिती/ अपिलीय अर्जासंबंधी कार्यवाही | गरजेनुसार वेळोवेळी | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **७. विधी कक्ष** | विद्यापीठाकडे दाखल सर्व न्यायालयीन प्रकरण संबंधी कामकाज हाताळणे, तक्रार निवारण समितीचे आयोजन / नियोजन करणे व कक्षाशी संबंधीत माहिती/ अपिलीय अर्जासंबंधी कार्यवाही | गरजेनुसार वेळोवेळी | | |
| **८. पेन्शन कक्ष** | विद्यापीठातील निवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांचे निवृत्ती प्रकरणे हाताळणे व कक्षाशी संबंधीत माहिती/अपिलीय अर्जासंबंधी कार्यवाही | गरजेनुसार वेळोवेळी | | |

दिनांक : ०५ जुन , २०२६

**स्वाक्षरीत/-**
(प्रिती वि. रोडगे)
कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# परिशिष्ट - १
# विद्यापीठाची रचना दर्शविणारा तक्ता

| कुलगुरु, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **कुलसचिव** | **संशोधन संचालक** | **संचालक<br>विस्तार शिक्षण** | **संचालक<br>शिक्षण** | **अधिष्ठाता<br>(कृषि)** | **अधिष्ठाता<br>(प.शि.सं.)** | **अधिष्ठाता<br>(कृषि अभियांत्रिकी)** | **अधिष्ठाता<br>(नि.कृ.शि)** |
| १. उपकुलसचिव (आस्था)<br>२. उपकुलसचिव (सामान्य)<br>३. उपकुलसचिव (वि.वि.)<br>४. सहा. कुलसचिव (आस्था)<br>५. सहा. कुलसचिव (परिक्षा)<br>६. सहा. कुलसचिव (साप्रवि)<br>७. सहा. कुलसचिव (समिती)<br><u>नियंत्रक</u><br>१. सहा. नियंत्रक (मुख्या)<br>२. सहा. नियंत्रक (अंदाज)<br>३. अधि.लेखाधिकारी, अकोला<br>४. अधि.लेखाधिकारी, नागपूर<br><u>विद्यापीठ अभियंता</u><br>१. उप अभियंता (विद्युत)<br>२. उप अभियंता<br>३. उप अभियंता, उपविभाग, नागपूर<br><u>विद्यापीठ ग्रंथपाल</u><br>१. सहा. विद्यापीठ ग्रंथपाल | १. सहयोगी संशोधन संचालक, अकोला<br>२. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, अकोला<br>३. मुख्य बिजोत्पादन अधिकारी, म.प्रा.प्र., वणी रंभापूर<br>४. सहयोगी संचालक, रा.कृ.सं.प्र., सिंदेवाही<br>५. सहयोगी संचालक, रा.कृ.सं.प्र., यवतमाळ<br>६. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र<br>• अकोला<br>• आकोट<br>• अमरावती<br>• आमगाव<br>• अचलपूर<br>• बुलडाणा<br>• एकार्जूना<br>• काटोल<br>• कुटकी<br>• नागपूर<br>• नवेगांव बांध<br>• रामटेक<br>• सिंदेवाही<br>• साकोली<br>• सोनापूर<br>• थारसा<br>• वाशिम | १. कृषि विज्ञान केंद्र<br>• हिवरा<br>• सेलसूरा<br>• साकोली<br>• सिंदेवाही<br>• सोनापूर<br>• यवतमाळ<br>• बुलडाणा<br>२. विस्तार कृषि विद्यावेत्ता, प्र. व भे. योजना<br>• नागपूर<br>• सिंदेवाही<br>• अकोला<br>• यवतमाळ<br>३. प्रभारी अधिकारी, विद्यापीठ मुद्रणालय, अकोला | सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला | १. सह.अधिष्ठाता, कृ.म. अकोला<br>२. सह.अधिष्ठाता, कृ.म. नागपूर<br>३. सह.अधिष्ठाता, उ.म. अकोला<br>४. सह.अधिष्ठाता, व.म. अकोला<br>५. सह.अधिष्ठाता, कृ.म. सोनापूर<br>६. सह.अधिष्ठाता, व.ना.कृ.जै.तं.म. यवतमाळ<br>५. विभाग प्रमुख<br>• कृषि विद्या<br>• कृषि प.दु.<br>• कृषि अभि.<br>• रसायनशास्त्र<br>• वनस्पती रोगशास्त्र<br>• किटकशास्त्र<br>• अर्थशास्त्र<br>• विस्तार<br>• उद्यानविद्या<br>• वनस्पतीशास्त्र<br>६. संचालक विद्यार्थी कल्याण | सह. अधिष्ठाता, पदव्युत्तर शिक्षण संस्था, अकोला | १. सह. अधिष्ठाता कृ.अ.म., अकोला<br>२. विभाग प्रमुख<br>• कृषि प्रक्रिया अभि<br>• कृषि शक्ती व औजारे<br>• सिंचन व निचरा<br>• मृद व जलसंधारण<br>• अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत<br>• कृषि स्थापत्य | १. सह. अधिष्ठाता, नि.कृ.शि., अकोला<br>२. प्राचार्य, कृ.तं.वि.<br>• हिवरा<br>• सेलसूरा<br>• बुलढाणा<br>• मुल-मारोडा<br>• निंबी<br>• सावंगी<br>• वरुड<br>• धारणी |

# परिशिष्ट - २

| अ. क्र. | पुरविण्यात येणा-या सेवा/ बाब | आवश्यक कागदपत्रे/ सेवा पुरविण्याची मुदत | सेवा कोठून मिळेल/ सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी | सेवा न मिळाल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल ते अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **संशोधन संचालनालय विभागा अंतर्गत पुरविण्यात येणा-या सेवा** | | | | |
| १ | बियाणे पुरविणे | मागणी अर्ज, संशोधन उपसंचालक (बियाणे) यांचे नावाने व आवश्यक शुल्क | कृषि माहिती केंद्र, बियाणे विक्री केंद्र, विद्यापीठातील सर्व संशोधन केंद्र | संशोधन संचालक/ संशोधन उपसंचालक (बियाणे) |
| २ | प्रॉडक्ट टेस्टींग | संशोधन संचालक यांचे नावाने विहीत नमून्यातील अर्ज व सेवा शुल्क<br>(अटी व शर्तींच्या अधिन राहून) | संबंधीत पिक विभाग, संबंधीत विभाग प्रमुख | संशोधन संचालक |
| ३ | कलमा/ रोपे पुरविणे | संबंधीत रोप वाटीकेकडे<br>(प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य) | संबंधीत रोप वाटीका विभाग | संशोधन संचालक |
| **विस्तार शिक्षण संचालनालय विभागा अंतर्गत पुरविण्यात येणा-या सेवा** | | | | |
| १ | कृषि पत्रिका (मासिक) | मासिक | प्रमुख संपादक | संचालक विस्तार शिक्षण |
| २ | कृषि संवादिनी (वार्षिक) | जानेवारी पहिला हप्ता | प्रमुख संपादक | संचालक विस्तार शिक्षण |
| ३ | कृषि विषयक पुस्तक छपाईसाठी संपादन/ प्रकाशन | दिलेल्या मागणी प्रमाणे वेळेवर | प्रमुख संपादक/ विभाग प्रमुख/<br>कृ.वि. केंद्र | संचालक विस्तार शिक्षण |
| ४ | डॉ. पं.दे.कृ.वि. बातमी पत्र | त्रैमासिक/ ठरलेल्या वेळेवर | प्रमुख संपादक/ प्र.वि.शि.अ. | संचालक विस्तार शिक्षण |
| ५ | कृषि दिनदर्शिका (वार्षिक) | गरजेनुसार वेळेवर | प्रमुख संपादक | संचालक विस्तार शिक्षण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | घडी पत्रिका (इतर विभागासाठी संपादन) | गरजेनुसार वेळेवर | विभाग प्रमुख/ वरिष्ठ शास्त्रज्ञ | संचालक विस्तार शिक्षण |
| ७ | शेतकरी मेळावे आणि परिसंवाद | गरजेनुसार वेळेवर | विभाग प्रमुख/ वरिष्ठ शास्त्रज्ञ | संचालक विस्तार शिक्षण |
| ८ | आकाशवाणी आणि दुरदर्शन कार्यक्रम | गरजेनुसार वेळेवर | विभाग प्रमुख/ वरिष्ठ शास्त्रज्ञ | संचालक विस्तार शिक्षण |
| ९ | शेतक-यांसाठी आणि अधिका-यांसाठी अल्पमुदती प्रशिक्षण कार्यक्रम | गरजेनुसार वेळेवर | विभाग प्रमुख/ वरिष्ठ शास्त्रज्ञ व कृ.वि. केंद्र | संचालक विस्तार शिक्षण |
| १० | कृषि प्रदर्शनी | गरजेनुसार वेळेवर | संचालक विस्तार शिक्षण/ विभाग प्रमुख, वरिष्ठ शास्त्रज्ञ | संचालक विस्तार शिक्षण |
| ११ | शेतक-यांचे प्रश्न | गरजेनुसार वेळेवर | विभाग प्रमुख, वरिष्ठ शास्त्रज्ञ | संचालक विस्तार शिक्षण |
| १२ | कृषि माहिती तंत्रज्ञान प्रसार व कृषि सेवा | गरजेनुसार वेळेवर | व्यवस्थापक कृषि माहिती केंद्र | संचालक विस्तार शिक्षण |
| १३ | पंदेकृवि बामती पत्र (त्रैमासिक) | गरजेनुसार वेळेवर | प्रमुख संपादक | संचालक विस्तार शिक्षण |
| १४ | खरीप पूर्व मेळावा (दरवर्षी खरीप हंगामाच्या सुरूवातीस) | गरजेनुसार वेळेवर | प्रमुख विस्तार शिक्षण अधिकारी | संचालक विस्तार शिक्षण |
| १५ | ॲग्रोटेक भव्य प्रदर्शनी (दरवर्षी डिसेंबर मध्ये) | गरजेनुसार वेळेवर | प्रमुख विस्तार शिक्षण अधिकारी | संचालक विस्तार शिक्षण |
| १६ | नि:शुल्क दुरध्वनी सेवा (टोल फ्री) | गरजेनुसार वेळेवर | माहिती अधिकारी कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र | संचालक विस्तार शिक्षण |

| अधिष्ठाता (कृषि/ कृषि अभियांत्रिकी) विभागा अंतर्गत पुरविण्यात येणा-या सेवा | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | शासकीय कृषि मेळावे व प्रक्षेत्र भेटीचे वेळी वनस्पती रोग शास्त्रज्ञाचे मार्गदर्शन | ७ दिवसाचे आत | विभाग प्रमुख, वनस्पती रोगशास्त्र, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला | अधिष्ठाता (कृषि), डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला |
| २ | रोग नमूना तपासणी | १५ दिवसाचे आत | | |
| ३ | दर गुरुवारी दुपारी २.३० ते ५.३० या कालावधीत दुरध्वनीद्वारे वनस्पती रोग शास्त्राचे मार्गदर्शन | तात्काळ | | |
| ४ | घाटे, अळी व विषाणू विक्री व माहिती सेवा | विषाणू उपलब्धतेनुसार माहिती त्वरीत देण्यात येईल | विभाग प्रमुख, किटकशास्त्र, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला | अधिष्ठाता(कृषि), डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला |
| ५ | ट्रायकोडर्मा विक्री व माहिती सेवा | विक्री उपलब्धतेनुसार / माहिती त्वरीत | | |
| ६ | किड व्यवस्थापनाबाबत शेतक-यांना मार्गदर्शन | आवश्यकतेनुसार, पत्राद्वारे, प्रत्यक्ष इ. | | |
| ७ | उद्यानविद्या विभागातुन (फळे, भाजीपाला, फुले प्रक्रिया) बाबत शेतक-यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे | ३-५ दिवसात | विभाग प्रमुख, उद्यानविद्या विभाग, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला. | अधिष्ठाता(कृषि), डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला |
| ८ | रोपवाटीका विभागातुन फळझाडांचे जातीवंत कलम/ रोपे व भाजीपाला बियाणे पुरविणे | तात्काळ | | |
| ९ | शेतक-यांच्या शेतावर जाऊन त्यांच्या समस्येवर मार्गदर्शन करणे | ५-७ दिवसात | | |
| १० | खतांच्या शिफारशीसाठी माती परिक्षण अहवाल देणे (सामु, क्षारता, सेंद्रीय कर्ब, उपलब्ध स्फुरद व पालाश) | १५ दिवसात | विभाग प्रमुख, रसायणशास्त्र व मृद विज्ञान विभाग, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला. | अधिष्ठाता(कृषि), डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला |
| ११ | फळबाग जमिनीच्या निवडीसाठी माती परिक्षण अहवाल देणे (तीन थरातील नमून्यामधून मुक्त चु-यांचे प्रमाण, सामु, क्षारता यांचे परिक्षण) | १५ दिवसात | | |
| १२ | पिकांच्या अवशेषांचे परिक्षण अहवाल देणे | १५ दिवसात | | |
| १३ | ओलीताच्या पाण्याचा परिक्षण अहवाल देणे | १५ दिवसात | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | जमिनीच्या भौतिक गुणधर्माबाबतचा अहवाल देणे (यांत्रिक विश्लेषण, जल वाहकता, घनता, जलधारणा शक्ती) | १५ दिवसात | विभाग प्रमुख, रसायणशास्त्र व मृद विज्ञान विभाग, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला. | अधिष्ठाता(कृषि), डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला |
| १५ | सुक्ष्म अन्यद्रव्यांचा परिक्षण अहवाल देणे (जस्त, तांबे, मंगल व लोह) | १५ दिवसात | | |
| १६ | शेतक-यांना कृषि रसायण व मृद विज्ञान विषयांवर मार्गदर्शन करणे | ८ दिवसात | | |
| १७ | फळ, फुलझाडांची कलमे पुरविणे | १० दिवसात | विभाग प्रमुख, उद्यानविद्या विभाग, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला. | अधिष्ठाता(कृषि), डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला |
| १८ | फळझाडांची तांत्रिक माहिती पुरविणे | १० दिवसात | | |
| १९ | भाजीपाल्याविषयी तांत्रिक माहिती पुरविणे | १० दिवसात | | |
| २० | गोपालकांना व्यवसायभिमुख दुग्ध व्यवसाय करतांना येणा-या अडचणींचे निराकरण, पशुंची निवड, पैदास, आहार, रोगराई इत्यादीचे व्यवस्थापनाची माहिती | ८ दिवसात | विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला. | अधिष्ठाता(कृषि), डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला |
| २१ | निर्माण होणा-या दुधाचे तुलनात्मक व व्यवसायात्मक दृष्टया पदार्थामध्ये रुपांतर, भेसळ ओळखणे, विविध चाचण्यांद्वारे गुणवत्ता ओळखणे इत्यादी बाबत मार्गदर्शन | ८ दिवसात | | |
| २२ | शेतक-यांना वनशेती विषयी मार्गदर्शन करणे | शेतक-यांनी प्रत्यक्ष भेट दिल्यास लगेच मार्गदर्शन दिल्या जाईल | सहयोगी अधिष्ठाता, वनविद्या महाविद्यालय, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला. | अधिष्ठाता(कृषि), डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला |
| २३ | वनवृक्ष रोपाची उपलब्धता शेतक-यांना कृषि म्हणुन रोपवाटीका तयार करुन चांगल्या प्रतीची रोपे तयार करणे | रोपे जूनमध्ये पुरविले जातात (उपलब्धतेनुसार) | | |
| २४ | विविध वृक्षाची माहिती घडी पत्रिकाद्वारे/ शेतक-यांना देणे व शेतक-यांना घडी पत्रिका विनामुल्य वितरीत करणे | घडी पत्रिका उपलब्ध असल्यास लगेच शेतक-यांना दिली जाईल | | |
| २५ | शेतक-यांना वनशेती संबंधी पत्राद्वारे विचारलेल्या किंवा दुरध्वनीद्वारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे किंवा समस्यांचे समाधान संबंधी तज्ञाद्वारे दुरध्वनीद्वारे अथवा पत्राचे उत्तर देऊन करणे | दुरध्वनीद्वारे विचारलेली माहिती लगेच दुरध्वनीद्वारे दिली जाईल, पत्राद्वारे माहिती विचारली असता एक ते दोन आठवडयाचे आत माहिती पुरविल्या जाईल. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २६ | कृषि संशोधन व कृषि विद्या विभाग शेती विषयक सेवा<br>१. शेतक-यांना मार्गदर्शन करणे<br>२. बियाण्यांची उपलब्धता करणे<br>३.गांडुळ खत निर्मितीबाबत मार्गदर्शन<br>४.विविध पिकांचे व पिक पध्दतीचे मार्गदर्शन<br>५. तण नियंत्रण बाबत मार्गदर्शन | त्वरीत | विभाग प्रमुख, कृषि विद्या विभाग,<br>डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला. | अधिष्ठाता(कृषि),<br>डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला |
| २७ | अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत व विद्युत अभियांत्रिकी विभाग सल्ला विषयक माहिती | एक आठवडा | विभाग प्रमुख,<br>अपारंपारिक उर्जा स्त्रोत व विद्युत अभियांत्रिकी,<br>डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला. | अधिष्ठाता(कृषि),<br>डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला |
| २८ | कृषि औजारे व यंत्राची माहिती विस्ताराकरीता | दोन दिवसात | विभाग प्रमुख,<br>कृषि शक्ती औजारे विभाग,<br>डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला. | अधिष्ठाता(कृषि),<br>डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला |
| २९ | मृद व जल व्यवस्थापनाबाबत तंत्रज्ञान | एक महिना | विभाग प्रमुख, मृद व जल संधारण विभाग,<br>डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला | अधिष्ठाता(कृषि),<br>डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला |
| ३० | १. कृषि प्रक्रिया अभियांत्रिकीबद्दल शैक्षणिक व संशोधन माहिती<br>२. कृषि प्रक्रिया उद्योगाबाबत उपलब्ध असलेली माहिती व सल्ला | आठ दिवस | विभाग प्रमुख, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी,<br>डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला. | अधिष्ठाता(कृषि),<br>डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला |
| ३१ | सिंचनाबाबत तांत्रिक सल्ला | १० दिवस | विभाग प्रमुख, सिंचन व निचरा,<br>डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला | अधिष्ठाता(कृषि),<br>डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला |
| **सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, अकोला अंतर्गत पुरविण्यात येणा-या सेवा** | | | | |
| १ | शेती विषयी निरनिराळया विषयासंबंधी मार्गदर्शन व योग्य सल्ला दिला जातो | त्वरीत | सर्व शाखा प्रमुख,<br>कृषि महाविद्यालय, अकोला | सहयोगी अधिष्ठाता,<br>कृषि महाविद्यालय, अकोला |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **कृषि संशोधन उपकेंद्र, अचलपुर अंतर्गत पुरविण्यात येणा-या सेवा** | | | | |
| १ | शेतक-यांना मार्गदर्शन करणे (वनस्पती रोगशास्त्र, वनस्पती किटकशास्त्र व उद्यानविद्या विभागाअंतर्गत) | त्वरित | सहयोगी प्राध्यापक (वनस्पती रोग शास्त्र), सहायक प्राध्यापक (किटकशास्त्र), सहायक प्राध्यापक (उद्यानविद्या) | प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन उपकेंद्र, अचलपुर |
| २ | बियाण्याची उपलब्धता करणे | त्वरित | कृषि संशोधन उपकेंद्र, अचलपुर | |
| ३ | कलमे/ रोपे पुरवठा | मागणीनुसार | कृषि संशोधन उपकेंद्र, अचलपुर | |
| **सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, नागपूर अंतर्गत पुरविण्यात येणा-या सेवा** | | | | |
| १ | कृषि संशोधन व कृषि विद्या विभाग शेती विषयक सेवा<br>१. शेतक-यांना मार्गदर्शन करणे<br>२. बियाण्यांची उपलब्धता करणे<br>३.गांडुळ खत निर्मितीबाबत मार्गदर्शन<br>४.विविध पिकांचे व पिक पध्दतीचे मार्गदर्शन | त्वरीत | अतिरीक्त सहाय्यक संचालक, कृषि महाविद्यालय प्रक्षेत्र, नागपूर | प्राध्यापक, कृषि विद्या, कृषि महाविद्यालय, नागपूर |
| २ | कृषि विषयक सल्ला<br>दर सोमवारी २.३० ते ५.३० पर्यंत शेतक-यांना हेल्प लाईन वरुन सल्ला व मार्गदर्शन | त्वरीत | कृषि विद्यावेत्ता, कृषि महाविद्यालय, नागपूर | प्राध्यापक, कृषि विद्या, कृषि महाविद्यालय, नागपूर |
| ३ | उद्यानविद्या<br>१. शेतक-यांना विद्या विषयक पिकांकरीता मार्गदर्शन करणे<br>२. कलमे/ रोपे पुरवठा<br>३.महाराज बाग/ तेलंगखेडी उद्यान दर्शन/पर्यटन | त्वरीत<br><br>मागणी नोंद करणे आवश्यक. उपलब्धी नुसार पुरवठा | प्राध्यापक, उद्यानविद्या<br><br>प्र.अ. महाराग बाग, नागपूर<br>प्र.अ. महाराग बाग, नागपूर | स.अ. कृ.वि., नागपूर<br><br>प्राध्यापक,उ.वि., कृ.वि. नागपूर<br>प्राध्यापक,उ.वि., कृ.वि. नागपूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | मृद विज्ञान व कृषि रसायनशात्र विभाग<br>१. माती तपासणी<br>२. पाणी तपासणी<br>३. खत तपासणी<br>४. उती पाणी तपासणी | <br>१५ दिवस<br>१५ दिवस<br>१५ दिवस<br>१५ दिवस | <br>सहा. प्राध्यापक, मृ.वि.कृ.र., नागपूर<br>सहा. प्राध्यापक, मृ.वि.कृ.र., नागपूर<br>सहा. प्राध्यापक, मृ.वि.कृ.र., नागपूर<br>सहा. प्राध्यापक, मृ.वि.कृ.र., नागपूर | <br>प्राध्यापक, मृ.वि.कृ.र., नागपूर<br>प्राध्यापक, मृ.वि.कृ.र., नागपूर<br>प्राध्यापक, मृ.वि.कृ.र., नागपूर<br>प्राध्यापक, मृ.वि.कृ.र., नागपूर |
| ५ | वनस्पती रोगशास्त्र विभाग<br>१. शेतक-यांना मार्गदर्शन<br>२. रोगांचे नमूने तपासणी<br>३. जैविक उत्पादन विक्री | <br>त्वरीत<br>१० दिवस<br>त्वरीत (उपलब्धतेनुसार) | <br>सहा. प्राध्यापक, व.रो.वि, नागपूर<br>सहा. प्राध्यापक, व.रो.वि, नागपूर<br>सहा. प्राध्यापक, व.रो.वि, नागपूर | <br>विभाग प्रमुख, व.रो.वि, नागपूर<br>विभाग प्रमुख, व.रो.वि, नागपूर<br>विभाग प्रमुख, व.रो.वि, नागपूर |
| ६ | पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग<br>१. पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय तसेच वैरण पिकांचे व्यवस्थापन मार्गदर्शन<br>२. गांडूळ खत पुरविणे | <br>त्वरीत<br>त्वरीत (उपलब्धतेनुसार) | <br>सहा. प्राध्यापक/ व.सं.स.<br>व.सं.स./ क.सं.स. | <br>प्राध्यापक, प.दु. विभाग, नागपूर<br>प्राध्यापक, प.दु. विभाग, नागपूर |
| ७ | किटकशास्त्र विभाग<br>१. शेतक-यांना मार्गदर्शन<br>२. किडग्रस्त नमूने तपासणी<br>३. जैविक उत्पादन विक्री | <br>त्वरीत<br>त्वरीत किंवा २ दिवसापर्यंत<br>उपलब्ध असल्यास त्वरीत किंवा मागणीनुसार तयार करुन देणे | <br>सहा.प्राध्यापक, कि.वि., नागपूर<br>सहा.प्राध्यापक, कि.वि., नागपूर<br>सहा.प्राध्यापक, कि.वि., नागपूर | <br>विभाग प्रमुख,कि.वि. नागपूर<br>विभाग प्रमुख,कि.वि. नागपूर<br>विभाग प्रमुख,कि.वि. नागपूर |
| ८ | विस्तार शिक्षण विभाग<br>१. शेतक-यांना मार्गदर्शन<br>२. दुरध्वनीवर मार्गदर्शन<br>३. डॉ.पी.डी.के.व्ही.,कृषक विज्ञान मंच | <br>त्वरीत<br>आठवडी (सोमवारी)<br>मासीक (महिन्यातील ३ शनिवारी) | <br>सहा. प्राध्यापक, वि.शि.वि. नागपूर<br>सहा. प्राध्यापक, वि.शि.वि. नागपूर<br>सहा. प्राध्यापक, वि.शि.वि. नागपूर | <br>विभाग प्रमुख, वि.शि.वि. नागपूर<br>विभाग प्रमुख, वि.शि.वि. नागपूर<br>विभाग प्रमुख, वि.शि.वि. नागपूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | कृषि अभियांत्रिकी विभाग<br>१. आधुनिक कृषि यंत्रे व औजारे यांचे प्रात्यक्षीक व प्रशिक्षण | १५ दिवसाचे आत | प्राध्यापक, कृ.अ.वि., नागपूर | स.अ., कृ.म. नागपूर |
| १० | अ.भा.स. वनशेती संशोधन प्रकल्प<br>१. वनशेती संशोधनाची माहिती<br>२. वृत्त प्रजातीची रोपे (विक्रीसाठी) | त्वरीत<br>त्वरीत (उपलब्धतेनुसार) | शास्त्रज्ञ, शे.सं.प्र., नागपूर | व.श., अ.भा.स. वनशेती संशोधन प्रकल्प, नागपूर<br>व.श., अ.भा.स. वनशेती संशोधन प्रकल्प, नागपूर |
| ११ | वनस्पतीशात्र विभाग<br>१. नविन तंत्रज्ञान माहिती, शेतकरी चर्चासत्र | त्वरीत | प्राध्यापक, व.शा. विभाग,नागपूर | प्राध्यापक,व.शा. विभाग,नागपूर |

दिनांक : ०५ जुन, २०२६

स्वाक्षरीत/-
(प्रिती वि. रोडगे)
कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला